| | |
|---|---|
| MHKO100003302019 | **नियमित दिवाणी दावा क्र.५५/२०१९**<br>**निशाणी क्रमांक २३ वरील आदेश**<br><br>**(श्री. बाबू संतू पाटील वि. श्री.प्रभाकर रामा आंबेकर वगैरे )** |

सदरचा अर्ज वादी १ ने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम आदेश ६ नियम १७ सह कलम १५१ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत कामी वादी चे कथन असे की, प्रस्तुत दावा यातील वादींनी यातील प्रतिवादी विरुध्द खरेदीपत्र रददबातल आहे असा ठराव होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर दावा चालू असतानाच यातील प्रतिवादी नं. २ हे मयत झाले आहेत. मयतास वारस वादी नं. १ ते ५ व प्रतिवादी नं. ३ हेच असून त्यांचे शिवाय अन्य कोणीही वारस नाहीत या कारणाने दावेतील व मनाई अर्जातील प्रतिवादी नं. २ यांचे नावास कंस करुन त्यापूढे खालील मजकूर नमूद करणेत परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी यांनी निशाणी २३ वर म्हणणे दिले असून. प्रस्तुत प्रतिवादींचे म्हणणे असे की, प्रस्तुतचे अर्जातील कथने चुकीची व बेकायदेशीर आहेत. प्रस्तुतचा अर्ज हा वादीने काम प्रलंबित करणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नसलेने, प्रस्तुतचा अर्ज खर्चासहीत नामंजूर करणेत यांवा अशी विनंती केली.

**०४.** प्रस्तुतचा अर्जाचे अवलोकन केले आणि दोन्ही बाजुचे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. यावरुन खालील मुद्दे माझ्या पुढे उपस्थित झाले त्यावरील कारणांसहित निष्कर्ष खालील प्रमाणे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी यांनी मागीतलेल्या दुरुस्तीमुळे त्यांचे मुळ दाव्याचे स्वरुपात बदल होणार आहे काय ? | ...नाही |
| २. | सदरची दुरुस्ती ही मुळ दाव्याच्या अंतिम निकालाकरीता आवश्यक आहे काय ? | ....होय |
| ३. | काय आदेश | अंतिम आदेशाप्रमाणे |

## –<u>कारणमिमांसा</u>–

**०५.** प्रस्तुत दावा, तसेच अर्ज व दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवादाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने दि. ०४/०९/२०१० रोजीचे खरेदीपत्र बेकायदेशीर असून ते रददबादल आहे असा ठराव होवून मिळणेसाठी व कायममनाई करीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी क्र. २ यांना वादी क्र. १ ते ५ व प्रतिवादी क्र. ३ हेच कायदेशीर वारस असलेचे कथन केले आहे. सदर कथनाबाबत प्रतिवादीने कोणताही आक्षेप घेतलेला नाही. तसेच वादी ने प्रस्तुत अर्जामध्ये मागितलेली दावेतील व मनाई अर्जातील दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असलेने सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार नाही.

**०६.** वादी ने प्रस्तुत अर्जामध्ये मागितलेली दुरुस्ती ही त्यांना दावेसोबत मनाई अर्जामध्ये सुध्दा करणेची असलेने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम आदेश ६ नियम

१७ अंतर्गत प्रस्तुतचा अर्ज चालणेस पात्र आहे. तसेच सदर दुरुस्तीमुळे पक्षकारामध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी मदत होणार आह. दुरुस्तीस मंजूरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. उलटपक्षी प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादीमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध होण्याची शक्यता आहे. तसेच प्रतिवादी यांना पुरावा देणेची संधी असलेने सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादीस कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र.२ चे उत्तर होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.३ करिता खाली आदेश पारीत करते.

## – आदेश –

१. वादीचा प्रस्तुत अर्ज (निशाणी २३) मंजूर करणेत येत आहे.

२. वादी ने सदरची दुरुस्ती या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत करणेची आहे.

३. वादी ने सदर दाव्याची दुरुस्त प्रत द्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Snehal Nivasrao Nikam
Location: Gadhinglaj
Date: 2021.03.17 17:18:15 +0530

दिनांकः– १७ /०३/२०२१ **( श्रीमती एस.एन.निकम)**

गडहिंग्लज ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,गडहिंग्लज